अर्जाचा नमूना                                                                                    दिनांक   /   /२०२६

अर्जदाराचे नाव: ______________________________

पुर्ण पत्ता ______________________________

______________________________

आधार कार्ड क्रमांक ______________________________

मोबाईल क्रमांक १ ______________________________

२ ______________________________

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर जि.सोलापूर.

विषय :– श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे मालकीच्या मौजे __________ ता. __________जिल्हा __________ येथील जमीनी लिव्ह ॲड लायसेन्सी वर मिळणेबाबत...

संदर्भ – आपले कडील जाहिर निवेदन क्र. वि.रू.मं.स.पं. जमिन/कावि/ /२०२६ दिनांक / /२०२६

महोदय,

आपले कडील संदर्भीय जाहीरात प्रसिध्द केले वरून खालील नमुद केलेली जमीन त्यापुढे नमुद केलेल्या अकरा महीने **दिनांक / /२०२६ ते / /२०२७ या कालावधी साठी** लिव्ह ॲड लायसेन्सी वर शेती करणेसाठी घेण्यास मी इच्छुक आहे.

| अ क्र. | जिल्हा | तालुका | गाव | गट नं. | क्षेत्र हे. आर | लघुत्तम दर रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

सदर बाबतीत जाहीर निवेदनामध्ये नमुद करण्यात आलेल्या खालील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**१)** वरील जमीन ही पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ चे कलम ३५ पोट कलम (२) (ख) च्या तरतुदीनुसार दि. / **/२०२६ ते दि.** / **/२०२७** या कालावधीसाठी ११ महिने लिव्ह ॲड लायसेन्सी वर देण्यात येईल.

**२)** श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीने नमुद केलेल्या न्युनतम रक्कमेपेक्षा जास्तीतजास्त लिलाव बोली रक्कम देणाऱ्या व्यक्तीस जमीन अकरा महीने कालावधीसाठी लिव्ह ॲड लायसेन्सी वर देण्यात येईल.

जिराईत जमिनी करीता मंदिरे समिती कडून प्रति गुंठा रक्कम रू. २००/— तसेच बागाईत जमिनी करीता प्रति गुंठा रक्कम रू. ३००/— दर निश्चित करण्यात आला आहे.

**३)** सदर जमीन लिव्ह ॲड लायसेन्सी वर घेतेवेळी अर्जदारांनी अनामत रक्कम डी डी व्दारे जमा करणे आवश्यक आहे. त्या क्षेत्राची न्यनतम रक्कम रू. ५०००/— च्या वर असेल अशा सर्व क्षेत्रासाठी शेतकरी अर्जदारांनी अनामत म्हणून रक्कम रू. ५०००/— भरावी लागेल. तसेच ज्या क्षेत्राची न्यनतम रक्कम रू. ५०००/— पेक्षा कमी आहे. अशा अर्जदार/शेतकरी यांनी अनामत रक्कम रू. १०००/— डी डी व्दारे जमा करावी. त्याचा तपशील सोबत जोडलेल्या अर्जात नमुद करावा. कार्यकारी अधिकारी श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावे काढलेला दिनांक / /२०२६ रोजीचा डी डी कमांक बॅकेचे नाव सदरचा डी डी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. व त्याची एक छायांकित प्रत आपणाकडे ठेवावी.

**४) सदर लिलाव बोली ही कार्यकारी अधिकारी यांचे दालनात होईल. ज्या शेतकरी/अर्जदार यांचा अर्ज पूर्ण असेल, कागदपत्र पूर्ण असतील अशा सर्व शेतकरी अर्जदार यांना त्या क्षेत्राची तोंडी लिलाव बोली सर्वा समक्ष घेण्यात येईल. त्यामध्ये जे अर्जदार/शेतकरी मंदिरे समितीने निश्चित केलेल्या न्युनतम रक्कमेच्या वर बोली बोलतील अशा अर्जदारास जमिन वापरास देण्यात येणार आहे. त्यानंतर प्रथम येणारे बोलीधारक यांनी नकार दिल्यास त्यानंतरचे अनुक्रमे दोन व तीन नंबरचे अर्जदार यांना जमिन लिव्ह ॲड लायसेन्सी वर वापरास देण्यात येईल.**

**५)** सदर अर्ज भरतेवेळी आपली रक्कम अर्जात नमूद करू नये, अन्यथा आपला अर्ज रद्द करणेत येईल. तसेच लिलाव प्रक्रियेत भाग घेऊन उच्चतम बोली बोलून, पुन्हा प्रक्रियेतून माघार घेणारे, नकार देणारे, शेतकरी अर्जदार यांची अनामत रक्कत परत मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

**६)** जमीनीत मंदिरे समितीच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतीही मोठी सुधारणा **( विंधन विहीर, शेततळे व विहीर तसेच राहणेकामी पक्की वस्ती )** करता येणार नाही.

**७)** जमीनी बाबतचा शेतसारा, शिक्षणकर, रोजगार हमी कर व वाढीव शिक्षणकर तसेच कॅनाल उपलब्ध असल्यास त्याची पाणी पट्टी, तसेच विद्युत पंप असल्यास त्याचे विद्युत बिल मंदिर समितीच्या वतीने मे.कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नांवे भरण्याची जबाबदारी पट्टेदाराची राहील. व त्या प्रमाणे बिल अदा केल्याच्या पावत्या ज्या त्या वर्षी इकडील कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील.

**८)** लिव्ह ॲड लायसेन्सी वर दिलेल्या जमीनी या पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ मधील तरतुदीनुसार श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांनी धारण केलेली मिळकत असल्याने व ती देवस्थान जमीन असल्याने त्याबाबत म.ज.म. अधिनियम १९६६ व मुंबई कुळ कायदा व शे..ज. न्या. अधि. १९४८ मधील तरतुदीनुसार कोणत्याही सक्षम न्यायालयाकडे दाद मागता येणार नाही, तसेच सध्या व त्यात्या वेळी असलेल्या प्रचलित कायदयाचा कोणताही आधार घेऊन मंदिर समितीवर कोणतीही व कसलीही दावा करता येणार नाही.

**९)** सदर जमिन वापरास दिल्यानंतर त्या बाबत न्यायालयातील वाद अथवा स्टे ऑर्डर (स्थगित आदेश) असेल तर त्याबाबतची न्यायालयीन आदेशाची प्रत स्टे ऑर्डर (स्थगित आदेश) या कार्यालयाकडे सादर करावी.

**१०)** सदर जमीनीच्या या क्षेत्रावर कोणताही बिनशेती वापर आणि कोणतेही बांधकाम करता येणार नाही. बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्यास मंदिरे समितीकडून कायदेशीर कारवाई करणेत येईल.

**११)** जमीनीच्या बांधावरील फळ झांडापासून मिळणाऱ्या उत्पन्नातील १/२ हिस्सा मंदिराकडे जमा करणे बंधनकारक राहील. शिवाय सदर क्षेत्रातील कोणत्याही झाडांची तोड करता येणार नाही. वटलेले झाड असल्यास त्याची माहिती मंदिर समितीला देवून रितसर परवानगी घेवून त्याची विल्हेवाट लावता येईल.

**१२)** नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे पिकाचे नुकसान झाल्यास त्याबाबत जमीन कसनारे शेतकरी यांना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मंदिर समितीकडे मागता येणार नाही.

**१३)** लिव्ह अॅड लायसेन्सी करिता जमा केलेली रक्कम कोणत्याही कारणास्तव परत मागता येणार नाही.

**१४)** नमूना लिलाव अर्ज मंदिरे समितीच्या श्री संत तुकाराम भवन तिसरा मजला येथील जमिन विभाग या कार्यालयात उपलब्ध होऊन मिळतील. प्रति अर्जाची रक्कम रू. १००/— इतकी राहिल तसेच प्रत्येक अर्जदार/शेतकरी यांना **एकच** अर्ज मिळेल. त्यासोबत त्यांने आधारकार्ड दाखविणे आवश्यक आहे. सदरचे अर्ज सुटटीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील.

**१५अ)** ज्याचे नावे लिलाव मंजूर होईल. त्यांनी लिलावाची होणारी संपूर्ण रक्कम १५ दिवसात भरणा करून विहीत नमून्यातील प्रतिज्ञापत्र सादर करावयाचे आहे. मुदतीत भरणा रक्कम भरली नाही तसेच प्रतिज्ञापत्र सादर केले नाही,सदर व्यक्तिच्या मालमत्तेवर बोजा नोंद करणेत येईल ती रक्कम जमिन महसुल थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल.

**१५ब)** सदर व्यक्तिस लिलाव प्रक्रियेतुन बाहेर काढण्यात येईल. व त्यानंतर क्रमाने त्यापेक्षा कमी दराचे बोलीधारक अर्जदार शेतकरी यांना सदरचे क्षेत्र वहितीस देण्यात येईल.

**१६) लिलाव प्रक्रियेत भाग घेणेसाठी स्वःता शेतकरी असणे आवश्यक आहे.स्वःताच्या नांवाचा ७/१२ अर्जासोबत सादर करावा.**

**१७)** निविदा फॉर्म भरून **दिनांक ०९/०७/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे दाखल करणे आवश्यक आहे. लिलाव अर्ज समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावेत. पोस्टाने उशिरा आलेले अर्ज व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच लिफाफ्यावर **(जमिन वहिवाटीस देणे कामी अर्ज तसेच गावाचे नांव व गट नंबर लिफाफ्याच्या वरील बाजुस स्पष्टपणे नमूद करावा.)**

**१८)** सदर कामासंबधी काही वाद उदभवल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

**१९)** सन २०२६ — २०२७ साठी निविदेव्दारे प्राप्त झालेले निविदा अर्ज त्याची लिफाफा उघडण्याची तारीख व वेळ आपणास अर्जा सोबत सदरची माहिती देण्यात येईल. तसेच मंदिरे समितीचे वेबसाईटवर पहावयास मिळेल.त्याच तारखेला वेळेत उपस्थित राहावे.

**२०)** काही कारणास्तव त्या दिवशी लिफाफा उघडणे शक्य नसल्यास अर्जदार यांना पुढील तारीख व वेळ कळविण्यात येईल.

**२१)** प्रत्यक्ष लिलाव बोलीचे दिवशी सदर अर्जदार/शेतकरी उपस्थित न राहिल्यास त्याचा अर्ज रद्द करणेत येईल. तसेच त्याची अनामत ठेव परत मिळणार नाही. याची नोंद घ्यावी.

**२२)** एखादे अर्जदार/शेतकरी यांना काही अपरिहार्य कारणास्तव लिलावा दिवशी उपस्थित राहणे शक्य नसलेस त्यांनी त्यांच्या जवळचे नातेवाईक/संबधितांना प्राधिकार पत्र देऊन पाठविलेस त्यांना

लिलाव प्रक्रियेत भाग घेता येईल. त्यांनी त्यावेळेस स्वतः चे आधारकार्ड दाखविणे बंधनकारक राहील. तसेच ज्या अर्जदारास उपस्थित राहता न आलेस त्यांनी दिलेला प्राधिकार पत्राचे व्यक्ती ही त्या जमिनीबाबत स्वतः अर्ज केलेली नसावी.

**२३)** सदर लिलाव बोली प्रक्रीया कार्यकारी अधिकारी ,व्यवस्थापक ,लेखाधिकारी अथवा विभाग प्रमुख याचे उपस्थितीत होईल.

**२४)** जमीन वापरास घेणारे शेतकरी यांची जमिन मंदिरे समितीच्या जमिनी लगत असल्यास, त्याने मंदिरे समितीच्या जमिनी मध्ये अतिक्रमण केल्यास तसेच बेकायदेशीर रित्या रस्ता केल्यास अन्य काही जमिनीस बाधककृत्य केल्यास तो वहिवाटदार शेतकरी यास मंदिरे समितीचे पुढील होणाऱ्या लिलाव प्रक्रियेत कायम स्वरूपी प्रतिबंध घालण्यात येईल.

**२५)** मंदिराची जमिन लिव्ह अॅड लायसेन्सी वर दिलेनंतर इतर पोट हिस्सेदारास देता येणार नाही. तसे केल्यास मंदिरे समितीचे नियमाचे उल्लघंन केल्याचे समजण्यात येईल. व लिव्ह अॅड लायसेन्सी रदद करण्यात येईल. व त्यास कायम स्वरूपी लिलावा मध्ये भाग घेणेस बंदी असेल.

**२६)** मंदिरे समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते मंजुर जमीन वापरकर्त्यास बंधनकारक राहील.

**२७)** कोणताही अर्ज अगर सर्वच अर्ज कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे किंवा रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मंदिरे समितीने राखून ठेवले आहेत.

**२८) यापुर्वी सदर जमिनी बाबत थकित बाकी असेल अशा अर्जदार/शेतकरी यांना सहभाग घेता येणार नाही.**

**२९)** नमूना लिलाव अर्ज व माहिती कार्यालयीन वेळेत श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे उपलब्ध होऊन मिळतील. अर्ज मिळण्याचे/स्विकारण्याचे ठिकाण हे वरील प्रमाणे राहील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर सर्व माहीती पहावयास मिळेल.

**३०)** वहिवाटदारा कडून उपरोक्त नमूद कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास कोणत्याही वेळी भाडेपट्टा रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील. लिव्ह अॅड लायसेन्सी रद्द झाल्यास/मुदतीत रक्कम न भरल्यास शेतातील उभ्या पिकांचे उत्पादन मंदिर समितीच्या मालकीचे होईल.

**३१)** वरील अटींची पुर्तता केली आहे याची खात्री झाल्यानंतरच जमीन लिव्ह अॅड लायसेन्सी ने दिल्याचा आदेश दिला जाईल.

२/— माझ्या ओळखीच्या व रहीवाशी पुराव्यासाठी मी खालील कागदपत्राच्या स्वसाक्षांकित सोबत सादर केल्या आहेत. आधार कार्ड/निवडणूक ओळखपत्र/राष्ट्रीयकृत बॅकेचे पासबुक/ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी एकाची स्वसाक्षांकित, रेशनकार्ड, स्वतःचे नावाचे विद्युत देयक सोबत जोडलेले आहेत. त्यासोबत माझे त्या गावातील ओळखीचे दोन व्यक्तींचे नावे व त्यांचे आधार कार्डच्या झेरॉक्स प्रतिवर स्वाक्षरी करून या अर्जासोबत सादर केले आहे.

तरी मी विनंती करतो कि, वर नमुद केलेली जमीन /जमीनी मला लिव्ह अॅड लायसेन्सी वापरास मिळावी. ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

अर्जदाराचे नांव ————————————————————

## फेर लिलाव मध्ये समाविष्ट असलेल्या जमिनीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१) जिल्हा — सातारा — कराड येथील जमिनी खालील प्रमाणे

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गाव | गट नं. | क्षेत्र हे. आर | सन २०२६–२०२७ साठीचा भाडे पटटा रककम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सातारा | कराड | आटके | ८३६ | ०.३५ | १०५०० |
| | बागायत | | | ८३७ | ०.३४ | १०२०० |
| | | | | ८३८ | ०.३४ | १०२०० |
| | | | | ९३८/२ | ०.०८ | २४०० |
| | | | | ९३७/२ | ०.१४ | ४२०० |
| | | | | ९३६/१ | ०.१० | ३००० |
| | | | | ९३४/२ | ०.११ | ३३०० |
| | | | | ९३३/३ | ०.२३ | ६९०० |
| | | | | ९३०/१ | ०.२२ | ६६०० |
| | | | | २४१ | ०.१४ | ४२०० |
| | | | | २४२ | ०.३० | ९००० |
| | | | | २४३ | ०.४२ | १२६०० |
| | | | | १९२/२ | ०.५७ | १७१०० |
| | | | ३.३४ | १३ | | |
| | | | | | | |
| २ | सातारा | कराड | कालवडे | १४६/१ | ०.५४ | १६२०० |
| | बागायत | | | १४६/२ | ०.४२ | १२६०० |
| | | | | १४३/३ | ०.७१ | २१३०० |
| | | | १.६७ | ३ | | |
| | | | | | | |
| ३ | सातारा | कराड | काले | १६८९ | ०.१५ | ४५०० |
| | बागायत | | | ९३७ | ०.६९ | २०७०० |
| | | | | ९३८ | ०.५७ | १७१०० |
| | | | | ९३९ | ०.२९ | ८७०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ९४० | ०.२२ | ६६०० |
| | | | | ९४१ | ०.२३ | ६९०० |
| | | | | ९७८ | १.५७ | ४७१०० |
| | | | | ९७९ | ०.६० | १८००० |
| | | | | ९८० | २.५४ | ७६२०० |
| | | | | ९८२ | ०.२२ | ३३०० |
| | | | | ९८४ | ०.२० | ६००० |
| | | | | ९८५ | ०.२९ | ८७०० |
| | | | | ९८६ | ०.२५ | ७५०० |
| | | | | ९८७ | ०.२७ | ८१०० |
| | | | | ९८८ | १.०६ | ३१८०० |
| | | | | ९८९/१ | ०.११ | ३३०० |
| | | | | ९८९/२ | ०.१३ | ३९०० |
| | | | | ९९० | ०.८० | २४००० |
| | | | | ९९१ | ०.२६ | ७८०० |
| | | | | ९९२/१ | ०.१३ | ३९०० |
| | | | | ९९२/२ | ०.१४ | ४२०० |
| | | | | ९९३ | ०.५७ | १७१०० |
| | | | | ९९४ | ०.२३ | ६९०० |
| | | | | ९९५ | ०.७० | २१००० |
| | | | | ९९६ | ०.७५ | २२५०० |
| | | | | ९९७ | ०.३७ | ११७०० |
| | | | | ९९८ | ०.३२ | ९६०० |
| | | | | ९९९ | ०.१९ | ५७०० |
| | | | | १००० | ०.१९ | ५७०० |
| | | | | १००१ | ०.२४ | ७२०० |
| | | | | १००२/१ | ०.१७ | ५१०० |
| | | | | १००२/२ | ०.१७ | ५१०० |
| | | | | १००३/१ | ०.११ | ३३०० |
| | | | | १००३/२ | ०.२१ | ६३०० |
| | | | | १००४ | ०.५३ | १५९०० |
| | | | | १००५ | ०.४४ | १३२०० |
| | | | | १००६/१ | ०.२३ | ६९०० |
| | | | | १००६/२ | ०.२३ | ६९०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १००६/३ | ०.२२ | ६६०० |
| | | | १६.५९ | ३९ | | |
| | | | | | | |
| ४ | सातारा | कराड | हेळगांव | २३७/अ | ०.२७ | ८१०० |
| | बागायत | | | | | |
| | | | ०.२७ | १ | | |
| | | | | | | |
| ५ | सातारा | कराड | पाचवडवस्ती | ००४/१ | ०.२६ | ७८०० |
| | बागायत | | | ००४/२ | ०.१७ | ५१०० |
| | | | | ००४/३ | ०.२५ | ७५०० |
| | | | ०.६८ | ३ | | |
| | | | | | | |
| ६ | सातारा | कराड | जाधवमळा | ९ | ०.७८ | २३४०० |
| | | | ०.७८ | १ | | |
| ७ | सातारा | कराड | दुशेरे | ८९२ | ०.०४ | १२०० |
| | **घरपड** | | | १००१/२ | ०.०७ | २१०० |
| | | | | १०१० | ०.०१ | ३०० |
| | | | | १०१२ | ०.०८ | २४०० |
| | | | | १०१३ | ०.०४ | १२०० |
| | | | | १०१४ | ०.०३ | ९०० |
| | | | | १०१५ | ०.०४ | १२०० |
| | | | | १०१६ | ०.०२ | ६०० |
| | | | | १०१७ | ०.०७ | २१०० |
| | | | ०.४० | ९ | | |
| | | | | | | |
| ८ | सातारा | कराड | | २४०/२ | ०.१० | ३००० |
| | बागायत | | | २४०/३ | ०.११ | ३३०० |
| | | | | | | |
| | | | ०.२१ | २ | | |
| | | | | | | |
| ९ | सातारा | कराड | यशवंतनगर (शिरवडे) | ६२० | १.६८ | ५०४०० |
| | बागायत | | १.६८ | **१** | | |
| | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| १० | सातारा | कराड | कोरेगांव | १०७ | ०.८५ | २५५०० |
| | बागायत | | | | | |
| | | | ०.८५ | १ | | |
| ११ | सातारा | कराड | भुयाचीवाडी | २१४ | ०.३८ | ११४०० |
| | बागायत | | | २१३ | ०.३७ | १११०० |
| | | | ०.७५ | २ | | |
| | | | | | | |
| १२ | सातारा | कराड | वडोली भिकेश्वर | ४/८१ | ०.३८ | ११४०० |
| | बागायत क्षेत्र | | | ४८२ | ०.३४ | १०२०० |
| | | | | ४८३ | ०.३१ | ९३०० |
| | | | १.०३ **२८.२५** | ३ **७८** | | |

**२) जिल्हा – सोलापूर – ता. पंढरपूर, माळशिरस, मोहोळ, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर , करमाळा या तालुक्यातील येथील जमिनी खालील प्रमाणे.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर | पंढरपूर | शेवते | ३३४ | १.८८ | ५६४०० |
| | बागायत क्षेत्र | | | | | |
| | | | १.८८ | १ | | |
| २ | सोलापूर | पंढरपूर | पंढरपूर | १२ | २.२८ | ६८४०० |
| | बागायत क्षेत्र | | | १३ | ०.२७ | ८१०० |
| | | | | २ | ०.८० | २४००० |
| | | | ३.३५ | ३ | | |
| ३ | सोलापूर | उत्तर सोलापूर | बेलाटी | २३८ | १.०८ | २१६०० |
| | जिराईत | | १.०८ | १ | | |
| | | | | | | |
| ४ | सोलापूर | दक्षिण सोलापूर | औज (आहेरवाडी) | ४९ | ४.४५ | ८९००० |
| | जिराईत | | ४.४५ | १ | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| ५ | सोलापूर | मोहोळ | मसलेचौधरी | ६०३ | ३.९७ | ७९४०० |
| | जिराईत | | | ६०६ | २.२३ | ४४६०० |
| | | | ६.२० | **२** | | |
| | | | | | | |
| ६ | सोलापूर | उत्तर सोलापूर | नरोटेवाडी | १२९ | ४.४१ | ८८२०० |
| | जिराइत | | ४.४१ | १ | | |
| | | | | | | |
| ७ | सोलापूर | करमाळा | शेलगांव वांगी | १७५ | २.०३ | ४०६०० |
| | | | २.०३ | १ | | |
| ८ | सोलापूर | करमाळा | लव्हे | १७ | ०.४५ | ९००० |
| | जिराईत | | | २१ | ०.२१ | ४२०० |
| | | | ०.६६ | २ | | |
| | | | | | | |
| ९ | सोलापूर | पंढरपूर | अनवली | ४२१ | २.६६ | ५३२०० |
| | जिराईत | | | ४८१ | १३.५७ | २७१४०० |
| | | | | ६१२ | ५.६७ | ११३४०० |
| | | | | ६१३ | ३.४० | ६८००० |
| | | | | ६१४ | ५.७६ | ११५२०० |
| | | | | ६१५ | ५.८९ | ११७८०० |
| | | | | | | |
| | | | ३६.९५<br>**६१.०१** | ६<br>**१८** | | |

**३) जिल्हा – सांगली– ता. पलूस, आटपाडी, या तालुक्यातील येथील जमिनी खालील प्रमाणे**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगली | पलूस | सुर्यगांव | १८७/१ | ०.२० | ४००० |
| | जिराईत | | | १८७/२ | ०.२० | ४००० |
| | | | | १८७/३ | ०.२० | ४००० |
| | | | | १८७/४ | ०.०८ | १६०० |
| | | | | १८७/५ | ०.१२ | २४०० |
| | | | | १८७/६ | ०.४० | ८००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १.२० | ६ | | |
| | | | | | | |
| २ | सांगली | पलूस | नागठाणे | ५४५ | १.६९ | ३३८०० |
| | जिराईत | | | | | |
| | | | १.६९ | १ | | |
| ३ | सांगली | आटपाडी | हिवतड | ११५४ | २१.१६ | ४२३२०० |
| | जिराईत | | २१.१६<br>**२४.०५** | १<br>**८** | | |

**४) जिल्हा – कोल्हापूर – ता. शिरोळ, गडहिंग्लज या तालुक्यातील येथील जमिनी खालील प्रमाणे**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | कोल्हापूर | गडहिंग्लज | वाघराळी | २२७ | ०.४६ | ९२०० |
| | जिराईत | | | २७७ | २.२१ | ४४२०० |
| | | | २.६७ | २ | | |
| | | | | | | |
| | | | **२.६७** | **२** | | |

**५) जिल्हा – अमरावती – ता. नांदगांव खंडेश्वर, अंजनगावसूर्जी या तालुक्यातील येथील जमिनी खालील प्रमाणे**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | नांदगांव खंडेश्वर | कंझरा | ६६/१ | १.४४ | २८८०० |
| | जिराईत | | १.४४ | १ | | |
| | | | | | | |
| २ | अमरावती | नांदगांव खंडेश्वर | गावनेर तळेगांव | ३३३ | ०.७८ | १५६०० |
| | जिराईत | | ०.७८ | १ | | |
| | | | | | | |
| ४ | अमरावती | नांदगांव खंडेश्वर | चिखलीवैद्य | २१ | ६.१६ | १२३२०० |
| | जिराईत | | ६.१६ | १ | | |
| | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | अमरावती | नांदगांव खंडेश्वर | वाटपूर | ५३/२ | १.१८ | २३६०० |
| | जिराईत | | १.१८ | १ | | |
| | | | | | | |
| ६ | अमरावती | अंजनगांव संर्जी | भंडारज | ४०० | २.८३ | ५६६०० |
| | जिराईत | | २.८३<br>**१२.३९** | १<br>**५** | | |

**६) जिल्हा – अकोला – ता. बार्शी टाकळी, अकोट, मुर्तिजापूर या तालुक्यातील येथील जमिनी खालील प्रमाणे.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अकोला | मुर्तिजापूर | पिंपळशेंडा | ४३ | ८.१६ | १६३२०० |
| | जिराईत | | **८.१६** | **१** | | |

**७) जिल्हा – यवतमाळ – ता. राळेगांव, दारव्हा, नेर, या तालुक्यातील येथील जमिनी खालील प्रमाण.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | यवतमाळ | राळेगांव | विरूळ | ५९ | ०.८१ | १६२०० |
| | जिराईत | | ०.८१ | १ | | |
| | | | | | | |
| २ | यवतमाळ | दारव्हा | शेंद्री | १२५ | २५.८५ | ५७१००० |
| | जिराईत | | | ६४ | ६.४९ | १२९८०० |
| | | | ३२ ३४ | २ | | |
| | | | | | | |
| ३ | यवतमाळ | दारव्हा | तळेगांव | १ | ०.८१ | १६२०० |
| | जिराईत | | | | | |
| | | | ०.८१ | १ | | |
| ४ | यवतमाळ | नेर | नाथ्रड | ३९ | १.०३ | २०६०० |
| | जिराईत | | १.०३ | १ | | |
| | | | | | | |
| ५ | यवतमाळ | नेर | सावरगांव | २९ | ७.४९ | १४९८०० |
| | जिराईत | | ७.४९ | १ | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | यवतमाळ | नेर | कारखेडा | ५६ | १.८४ | ३६८०० |
| | जिराईत | | १.८४<br>**४४.३२** | १<br>**७** | | |

**८) जिल्हा – धाराशिव – ता. परांडा या तालुक्यातील येथील जमिनी खालील प्रमाणे**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धाराशिव | परांडा | करंजा | ९० | ७.८१ | १५६२०० |
| | जिराईत | | **७.८१** | **१** | | एकुण क्षेत्रा पैकी ४.८१ आर इतके क्षेत्र वहिवाटीस योग्य आहे. |

**९) जिल्हा – नागपूर – ता. नरखेड, कळमेश्वर, उमरेड या तालुक्यातील येथील जमिनी खालील प्रमाणे**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपूर | नरखेड | भिष्णुर | ३९९/१ | ३.७८ | ७५६०० |
| | जिराईत | | | ३९९/२ | १.१४ | २२८०० |
| | | | | ३९९/३ | १.६० | ३२००० |
| | | | ६ ५२ | ३ | | |
| | | | | | | |
| २ | नागपूर | कळमेश्वर | खानगांव | १४२ | १.२५ | २५००० |
| | जिराईत | | | | | |
| | | | १.२५ | १ | | |
| ३ | नागपूर | कळमेश्वर | धापेवाडा | ५०१ | ३.१२ | ६२४०० |
| | जिराईत | | | | | |
| | | | ३.१२ | १ | | |
| ४ | नागपूर | उमरेड | लोहारा | ४२८ | ७.१६ | १४३२०० |
| | जिराईत | | ७.१६<br>**१८.०५** | १<br>**६** | | |

**१०) जिल्हा – वर्धा – ता. समुद्रपूर या तालुक्यातील येथील जमिनी खालील प्रमाणे**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | समुद्रपूर | मांडगांव | ६६९/१ | ०.२० | ४००० |
| | | | ०.२० | १ | | |
| | | | | | | |
| २ | वर्धा | समुद्रपूर | गाडामोडी | ४३ | ७.६५ | १५३००० |
| | | | ७.६५ | १ | | |
| | | | | | | |
| ३ | वर्धा | समुद्रपूर | सावंगी | ३५ | ३.८४ | ७६८०० |
| | | | ३.८४<br>**११.६९** | १<br>**३** | | |

**११) जिल्हा – अहमदनगर – ता. श्रीगोंदा, नेवासा या तालुक्यातील येथील जमिनी खालील प्रमाणे.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | श्रीगोंदा | देऊळगांव | ८२ | ३.१० | ६२००० |
| | | | ३.१० | १ | | |
| | | | | | | |
| **२** | अहमदनगर | नेवासा | सोनाई | ७५४/१ | ०.७६ | १५२०० |
| | | | ०.७६ | १ | | |
| | | | | | | |
| ३ | अहमदनगर | नेवासा | घोडेगाव | २१५ | ६.२१ | १२४२०० |
| | | | ६.२१ | १ | | |
| | | | | | | |
| ४ | अहमदनगर | नेवासा | सलाबतपूर | ७६/२ | १.४१ | २८२०० |
| | | | १.४१ | १ | | |
| | | | | | | |
| ५ | अहमदनगर | श्रीगोंदा | पिसोरेखांड | २ | २.७० | ५४००० |
| | | | २.७० | १ | | |
| | | | | | | |
| ६ | अहमदनगर | श्रीगोंदा | चिखलठाण वाडी | ७७ | ४.४५ | ८९००० |
| | | | | ७८ | १९.३१ | ३८६२०० |
| | | | २३.७६<br>**३१.९४** | २<br>**७** | | |

**१२) जिल्हा – बीड– ता.गेवराई,या  तालुक्यातील येथील जमिनी खालील प्रमाणे**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बीड | गेवराई | अंतरवाली | १७८ | ९.८७ | १९७४०० |
| | जिराईत | | | | | |
| | | | **९.८७** | **१** | | |
| | | | | | | |

**अर्जदार यांनी अर्जा सोबत सादर करायची कागदपत्रे खालील प्रमाणे**
**(जोडलेल्या कागदपत्रा पुढे अशी खुण करावी.)**

| **अ क्र.** | **अर्जा सोबत जोडलेल्या कागदपत्राचा तपशिल** | **जोडले आहे** | **जोडले नाही** |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे आधार कार्ड | | |
| २ | बॅक पासबुक | | |
| ३ | निवडणुक ओळखपत्र | | |
| ४ | रेशन कार्ड | | |
| ५ | अर्जाची रक्कम भरलेली पावती | | |
| ६ | अनामत ठेव पावती/डी डी | | |
| ७ | ओळखीच्या दोन व्यक्तीचे नांव व त्यांचे आधार कार्ड | | |
| ८ | अर्जदाराचे स्व:ताचे नाव असलेला ७/१२उतारा | | |
| **टीप – अ.क्र. १ ते ४ पैकी कोणताही एक रहिवासी पुरावा अर्जासोबत जोडावा.** | | | |

१) वहिवाटदार/शेतकरी यांना मंदिरे समितीकडून अर्ज उपलब्ध करून देणे दिनांक ०१/०७/२०२६

पासून

२) अर्ज स्विकारण्याची शेवटी तारीख दिनांक ०९/०७/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत

## प्रतिज्ञापत्राचा नमूना

मे. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार —————— तहसिल —————— जिल्हा ——————————— यांचे समोर मा. कार्यकारी अधिकारी श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना मी श्री. ——————————————— रा. ———————— ता. ———————— जिल्हा ——————————————— वय — वर्षे व्यवसाय — शपथपूर्वक प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, मौजे —————————— ता ————————— जिल्हा ——————————— येथील कार्यकारी अधिकारी श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावे खालील तपशिला प्रमाणे असलेली देवस्थान जमीन/जमीनी ११ महिने ( ०१/०८/२०२६ ते ३०/०६/२०२७) लिव्ह अॅड लायसेन्सी वर घेण्याबाबत खालील अटी मला मान्य आहेत. व सदर अटीचे मी पालन करण्यास तयार आहे.

| अ.क्र. | जमीन गट नंबर/स.न. | क्षेत्र हे. आर | जमीनीचा प्रकार जिराईत/बागाईत | जमीनीचा लिव्ह अॅड लायसेन्सी ( लिलाव बोली मधील रक्कम ) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**<u>अटी</u>**

**१)** वरील जमीन /जमीनी या पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ चे कलम ३५ चे पोट कलम (२) (ख) च्या तरतुदी अनुसार ११ महिने कालावधीसाठी वापरास देण्यात येईल हे मला मान्य आहे.

**२)** सदर जमीनीचे वर नमूद केलेला जमीनीचा वाषिक लिव्ह अॅड लायसेन्सी रक्कम रूपये /— मी मंदिरे समिती कडील जमा पावती क्रमाक दिनांक / /२०२६ अन्वये भरलेला आहे.

**३)** मंदिरे समितीने यावर्षी जमीनी क्षेत्राकरीता दिलेला प्रति हे. आर चा दर मला माहित आहे व मला मान्य आहे.

४) सदर जमीन लिव्ह अॅन्ड लायसन्सी तत्वावर मला देण्यात आली आहे. त्या करीता भरलेली रक्कम मला परत मागता येणार नाही.

५) मला मिळालेल्या जमीनीत पोट हिस्सेदार ठेवलेचे निदर्शनास आलेस मंदिरे समिती माझेवर कार्यवाही करेल.

**६)** जमीनीत मंदिर समितीचे पुर्व परवानगी शिवाय कोणतीही मोठी सुधारणा करणार नाही तसेच अतिक्रमण करणार नाही.

**७)** जमीनीत घ्यावयाचे पिकासाठी व त्याबाबतच्या मेहनत मशागतीसाठी केलेल्या खर्चाचा मोबदला श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीस मी मागणार नाही.

**८)** सदर जमीनी बाबतचा जमीन शेतसारा, शिक्षणकर, रोजगार हमी कर व वाढीव शिक्षण कर तसेच कॅनॉल उपलब्ध असल्यास त्याचे पाणी घेण्यासाठी लागणारी पाणी पट्टी, तसेच विद्युतपंप असल्यास त्याचे विद्युत बिल मी भरण्यास तयार आहे. व त्याबाबतचे बिल अदा केल्याच्या पावत्यांच्या सत्यप्रती कार्यकारी अधिकारी श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचेकडे मुळप्रती त्याच्या खरेपणा बद्दल दाखवून मी तात्काळ जमा करण्यास तयार आहे. ते माझेवर बंधनकारक राहील.

**९)** वरील जमीनी या पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ मधील तरतुदीनुसार कार्यकारी अधिकारी श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांनी धारण केलेली मिळकत असलेने व ती श्री.विठ्ठल रूक्मिणी पंढरपूर या देवस्थानची मिळकत असलेने त्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व मुंबई कुळ कायदा व शेत जमीन न्यायाधिकरण अधिनियम १९४८ मधील तरतुदी अनुसार कोणत्याही सक्षम न्यायालयाकडे मला दाद मागता येणार नाही. अगर सध्या व त्यात्या वेळी असलेल्या प्रचलित कायदयाचा कोणताही आधार घेऊन मंदिर समितीवर कोणतीही व कसलीही दाद मागता येणार नाही.

**१०)** वरील जमीनीत मी कोणतेही बांधकाम करणार नाही. तसेच मंदिर समितीचे जमिनीत माझेकडून अतिक्रमण, बेकायदेशीर रस्ता अथवा बाधक कृत्य केल्याचे निदर्शनास आलेस माझा जमीन कसणेचा वापर कायमस्वरूपी संपुष्टात येईल हे मला मान्य आहे.

**११)** सदर जमीनीतील कोणत्याही झाडांची तोड करणार नाही. एखादे झाड वटले आहे असे माझे निर्दशनास आलेस त्यांची माहिती मंदिर समितीला मी ताबडतोब देईन व त्यांचे कडून जो निर्णय त्याबाबत घेतला जाईल तो मला मान्य असेल.

**१२)** सदर जमीनीत असणारे जुनी (पुर्वीचे) फळ झाडे त्यांची निगा राखून त्यास येणारे फळे अथवा त्यापासून मिळणारे उत्पन्नाचा अर्धा हिस्सा मी मंदिरे समितीकडे जमा करेन.

**१३)** सदर जमीनी बाबत मी कोणताही हक्क सांगणार नाही.

**१४)** नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे पिकाचे नुकसान झाल्यास त्याबाबत माझेकडून मंदिर समितीकडे कोणत्याही प्रकारची रक्कम अथवा नुकसान भरपाईची मागणी केली जाणार नाही.

**१५)** वरील प्रमाणे सर्व अटी मला मान्य आहेत तरी मला वर नमूद जमीन लिव्ह ॲड लायसेन्सी वर दिल्याचा आदेश देण्यात आले नंतर मी त्याचे पालन करण्यास तयार आहे.

**१६)** मंदिरे समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते माझेवर बंधनकारक राहतील.

**१७)** सदर कामासंबधी काही वाद उदभवल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

**१८)** प्रशासकीय व अन्य कारणास्तव किंवा कोणतेही कारण न देता लिलाव कोणत्याही स्तरावर रद्द अथवा स्थगित ठेवण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे.

**१९)** सदर जमीनीचा कालावधी ११ महिने आहे. व त्यानंतर माझी जमीन कसण्याची इच्छा झाल्यास जमीन कसणेस मिळण्यासाठी नव्याने लिलाव प्रक्रियेत भाग घेऊन अर्ज व प्रतिज्ञापत्र मी सादर करेन.

हे प्रतिज्ञापत्र आज दिनांक / /२०२६ रोजी तहसिल कार्यालय ———— जिल्हा ————— येथे शपथेवर लिहून दिले आहे.

वरील सर्व माहिती खरी व बरोबर असून यात कांही चुक आढळल्यास भारतीय न्याय संहिता कलम २२९ नुसार दंडास अगर शिक्षेस मी पात्र राहीन.

साक्षीदार — प्रतिज्ञापत्र लिहून देणाराची सही

हे माझे पुर्ण परिचयाचे असून मी त्यांना ओळखतो

| सही | सही |
|---|---|
| श्री. ———————————————— | श्री. ———————————————— |